GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 2
Issue: 5
September- October: 2025

# ग्रामीण कवीता – दैनंदिन जीवनातील वास्तव'

**ज्योती नारायण कडू**
सहायक प्राध्यापक (मराठी)
प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, नऱ्हे, पुणे
9529328126 jyoti210025@gmail.com

**प्रस्तावना –**

काळया मातीतून सोनं पिकवायाचं असेल तर, त्या काळया मातीत उन्हा–पावसात, थंडी वा–याचा कडाका सोसत काम करावं लागतं. काळया मातीत राबतांना हा सृजनाचा सोहळा, कृषी संस्कृतीचं वैभव त्या मातीत खपणारालाच पहायला मिळतं. इथे फक्त शेतकरीच कष्ट करतो असे नाही तर त्याच्या बरोबरीने त्याची बायकोही राबते. घरचं सगळं सांभाळून मुलाबाळांचं आवरुन घरधन्याला भाकरी घेवून जाते. आयुष्यभर तीचा जीव घरदार, मुलंबाळं, नवरा, शेतीमाती यातच गुंतलेला असतो. कवयित्री विदया दौलत सरपाते हया त्यांच्या 'सोनं मातीतलं वेचतांना' या कवितासंग्रहात लिहितात की,

झुंजू मुंजू पहाटेला
जाते पाणी शेदायला
तोल सारा सांभाळून
फेके बाई पोह–याला

पूर्वी ग्राणीण भागात झुंजू मुंजू पहाटेला स्त्रिया विहीरीवर पाणी भरण्यासाठी जात असत. पाणी शोधण्यासाठी पोह–याचा उपयोग करत असत आणि तो पोहरा विहिरीत फेकत असत म्हणजे पोह–यासोबत विहिरीत पडायची भीती नसायची. प्रस्तूत वरील कडव्यात कवयित्री म्हणते की, स्त्री ही सकाळी उठल्या पासून पाणी शेंदायला जाते म्हणजे घरासाठी राबत असते. काम करता करता ती घराला सांभाळून घेते, ती स्वतः सगळं सहन करते. शारीरिक मानसिक तोल ढळू न देता संसार सांभाळते. पूर्वी पिठाच्या गिरण्या नव्हत्या. आकाशात शुक्राची चांदणी उगविली की, स्त्रिया जात्यावर दळण करायच्या. या संदर्भावरुनच मला जेष्ठ कवयित्री प्रतिमा इंगोले यांच्या दोन ओळी आठवतात.

'दयतो दयन म्हणतो कायनी,
गावात लपल्या अभागी बयनी,

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 2
Issue: 5
September- October: 2025

बेलता बोलेना बयनी गुणाच्या
झाकल्या उरांत कायन्या सोताच्या,

कवयित्री प्रतिमा इंगोले म्हणतात, सकाळच्या प्रहरी खेडयातल्या बायका उठतात दळण दळायला बसतात त्या दळण दळत असतांना आपल्या जीवनातील दु:ख त्यांच्या गाण्यातून व्यक्त करतात. दु:ख व्यक्त करत असतांना कधी तरी त्या दु:खाचा उद्रेक होतो. अषा वेळी गाणं गातांना बाया म्हणतात.

'सकायच्या पारी दयनाचा येतो राग,
हात दुखले उठ नव–या दयू लाग,

कवयित्री म्हणतात, जात्यातील धान्यांगत तीचं आयुष्यही भरडलं जात असल्याची जाणीव जेव्हा तीला होते. तीच्या मनातील दु:ख किंवा वेदना या ओळीतून बाहेर पडतात. नंतर स्त्रियांना घराचं अंगण झाडून सडा सारवण करावं लागे. पूर्वी घरं मातीची होती. घरोघरी मातीच्या चूली होत्या. चूल रोज सारवल्याषिवाय पेटवली जात नसे. पूर्वीचा काळ गुराढोरांनी समृध्द असा काळ होता. बहूतेक स्त्रियांना शेण काढून ते उकीरडयावर न्यावे लागत असे. शेणाच्या गव–या थापून त्याचा उडवा रचण्याचे काम देखील स्त्रिया करीत असत. एकत्र कुटुंब पध्दती असल्याने घरातील लहान थोरांना सांभाळून संयमानं त्या वागायच्या संसाराची गराडयात स्वतः कडे लक्ष दयायला वेळ नसायचा. एवढं करुन देखील त्यांचं तेज झळाळून जायचं. कवयित्री विदया दौलत सरपाते हया त्यांच्या 'सोनं मातीतलं वेचतांना' या कवितासंग्रहात लिहितात की,

'हांडयावर घेई हांडा,
चुंभळीचा ग आधार
कटीवर घागरीला
मोर ठसे नक्षीदार,

घर संसार म्हटला की, जबाबदा–या या आल्याच आणि सगळया जबाबदा–यांचं ओझं धिराणे, संयमाने पेलायच्या. घरची सगळी कामं आटोपून त्या शेतात देखील राबायच्या पेरणी, खुरपणी, उन्हाळयात पेरणीपूर्व मषागत, कापूस वेचणी करायच्या. सुगीच्या दिवसात तर ग्रामीण स्त्रीची फार धावपळ होते. पाच–सहा मुलं पदरात असायची त्यावेळी आर्थिक परीस्थिती बेताची असली तरी

मुलांचं संगापन आणि संस्कार त्या करायच्या. आजकाल स्त्रीयासाठी नवनवीन योजना शासनामार्फत राबवल्या जात आहेत. उदा. सुकन्या योजना, बवत गट योजना, उज्वला योजना, गरोदर माता योजना, संजय गांधी योजना इ. त्यामुळे स्त्रीयांच्या जगण्यात कष्टात काही प्रमाणात नक्कीच सुधारणा झालेल्या दिसतात.

'तान्हुल्याच्या ग ओढीनं,
पाणी भरे सरसर
फुटका बाई रांजण
थेंबे थेंबे गळे सारं

वरील ओळीत कवयित्री म्हणते की, स्त्री ही आपल्या लेकरांच्या सुखासाठी अहोरात्र झटत असते. पण तीच्या पदरी मात्र उपेक्षा आणि अवहेलनाच येते. कितीही काबाड कष्ट केले तरी म्हातारपणी मुलं त्यांना वा—यावर सोडून देतात. आधार तर देतच नाही काही स्त्रीया हया फक्त कष्टाच्याच धनी असतात. नव—याची मारहाण सहन करुन संसार सांभाळतात. इथे मला कवयित्री रुपाली फरांदे यांच्या''स्पर्ष चांदण्यांचा'' या कविता संग्रहातील ओळी आठवतात.

'सगळं काही सोसूनही
जगण्याबाबत तक्रार नव्हती
परतीच्या मार्गावरही
कसलीच मागणी नव्हती
शांत जळणा—या निरंजनाचीच
काय ती सोबत होती
जमा केलेल्या क्षणांची
सोबतीला गाठोडी होती

स्त्री कुठलीही अपेक्षा न ठेवता स्वतःसाठी सिध्द होउ पाहत आहे. प्रत्येक परीस्थितीवर मात करण्यासाठी षिक्षण घेवून प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवत आहे. जेष्ठ कवयित्री आधुनिक बहिणाबाई विमलताई माळी ज्या स्वतःच्या षिक्षणाचा उल्लेख करतांना मोठया अभिमानाने सांगतात. षिक्षण 2 री, डिग्री खुरपं, त्यांच्या हुंकार काळया आईचा या कविता संग्रहात आजच्या तरुणींविषयी लिहीतात की,

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 2
Issue: 5
September- October: 2025

'ज्ञानज्योती घेवूनी हाती
दारोदारी फिरली
अज्ञानाची काळी काजळी,
मागे मागे सारली

या ओळी त्यांनी आपल्या सर्वांची माय सावित्रीबाई फुले यांच्यासाठी लिहिल्या आहेत. त्यांनी कष्ट घेतले म्हणून आज मुली षिकत आहेत आणि षिकून मुली काय करत आहेत हे सांगतांना त्या लिहितात की,

या मातेने स्त्री अबलेचे
बांधीव डोळे सोडले
चूल मुल या ब्रीदवाक्याला
मातीमध्ये गाडले
'कमळ परागु ज्ञान तारका
घरोघरी हा ठेपल्या
शिकल्या सा—या गोजिरवाण्या
उंच पदावर झेपल्या,

कवयित्री विमलताई माळी यांच्या काव्य पंक्तीतून आपल्याला दिसून येते की, सावित्रीमाईने दिलेल्या षिक्षणाचा वसा घेवून मुली प्रत्येक क्षेत्रात आपल्या कुटुंबासोबतच देषाच्या विकासास हातभार लावत आहेत.

संदर्भ : —

1) सोनं मातीतलं वेचतांना — विदया दौलत सरपाते, प्रथम आवृत्ती 2022, प्रियविदया प्रकाषन, बुलढाणा
2) स्पर्ष चांदण्यांचा — रुपाली फरांदे, प्रथम आवृत्ती जानेवारी 2016, गंथसखा प्रकाषन, पुणे
3) भुलाई — प्रतिमा इंगोले, द्वितीय आवृत्ती 1999, सोनल प्रकाषन, अमरावती
4) हुंकार काळया आईचा — विमलताई माळी, प्रथम आवृत्ती 2016, युगंधर प्रकाषन, पुणे